Education and Society
(शिक्षण आणि समाज)

Special Issue
UGC CARE Listed Journal
ISSN 2278-6864

# Education and Society

Since 1977

**The Quarterly dedicated to Education through Social Development and Social Development through Education**

**February 2023**

**(Special Issue-1/ Volume-II)**

PRINCIPAL
T.S.S's. Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Tal. Sakri, Dist. Dhule

INDIAN INSTITUTE OF EDUCATION

128/2, J. P. Naik Path, Kothrud, Pune - 411 038

## Indian Institute of Education

## Education and Society

Special Issue on the theme of 'Human Life and Techonology'
(Special Issue for two days National Seminar orgranized by Shripatrao Chougule Arts and Science College Malwadi-Kotoli dated 7 February 2023)



**Prof. J. P. Naik and Dr. Chitra Naik**
Founder of the Institute

**Mr. Sanjeev S. Sharma**
Administrator

**Editorial Board:**

Dr. Jayasing Kalake, Chief Ediotr
Dr. Prakash B. Salavi, Executive Editor
Mrs. Shailaja D. Sawant, Secretary



**Publisher:**
Indian Institute of Education
J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38

**Contact Numbers:** 8805159904, 9834109804
**Web-site:** www.iiepune.org
**Email:** educationandsociety1977@gmail.com, iiepune1948@gmail.com



PRINCIPAL
I.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule


---


Education and Society, the educational quarterly is owned, printed, and published by the Indian Institute of Education, Pune. It is printed at Pratima Mudran, 1-B, Devgiri Istate, Survey No. 17/1-B, Plot no. 14, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune 38. It is published by the Editor Dr. Jayasing Kalake at Indian Institute of Education J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38. Opinions or views or statements and conclusions expressed in the articles which are published in this issue are personal of respective authors. The editor, editorial board and the institution will not be responsible for the same in any way.

# नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोकजीवनावरील आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा अभ्यास

डॉ. शरद बाबुराव सोनवणे
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे

**सारांश:**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासाच्या माध्यमातून जीवनाच्या सर्व क्षेत्रात नवीन विचारांचा प्रवेश झालेला आहे आणि त्याद्वारे समाजाची वाटचाल प्रगतीच्या दिशेने झालेली आहे. मात्र जगभरातील आदिवासी समाजाचा आधुनिकतेशी परिचय व्हायला बराच उशीर झालेला आहे. आजही अनेक आदिवासी जमाती आधुनिकता आणि तंत्रज्ञान याबाबतीत अनभिज्ञ आहेत. असे असले तरी अनेक आदिवासी जमातींचा आधुनिकतेची परिचय झालेला असून त्याचा प्रभाव त्यांच्या लोक जीवनावर झालेला आहे. महाराष्ट्राच्या नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचा ब्रिटिशांशी संपर्क आला होता तेव्हापासून त्यांचा आधुनिकतेची परिचय होण्यास सुरुवात झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र शासनाने जाणीवपूर्वक आदिवासींच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना आखून आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. परिणामी काही प्रमाणात का असेना आधुनिकता व तंत्रज्ञानाचा आदिवासींशी संपर्क होऊ लागला व त्याचा परिणाम आदिवासी लोक जीवनावर झाला. म्हणूनच नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोक जीवनावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

**कळीचे शब्द:** आदिवासी, आधुनिकता, तंत्रज्ञान, सामाजिक बदल

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-वायव्य दिशेला असलेल्या नंदुरबार जिल्ह्यात सातपुडा पर्वतरांगांच्या भागात व लगतच्या सखल मैदानी प्रदेशात आदिवासी समाजाचे वास्तव्य आहे. पूर्वापार त्यांनी नेहमी बाह्य समाजापासून अलिप्त राहणे पसंत केले असले तरी सामान्यपणे ब्रिटिश काळापासून येथील आदिवासींचा प्रगत समाजाशी संपर्क यायला सुरुवात झाल्याचे म्हटले जाते. ब्रिटिशांसोबत त्यांचे अनेक संघर्ष देखील झालेले आहेत. ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबरच ख्रिश्चन मिशनऱ्याही येथे पोहचल्यामुळे इतर प्रदेशातील आदिवासींच्या तुलनेत नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचा आधुनिकतेशी परिचय होऊ लागला होता. आधुनिकता आणि त्यासोबत येणारे तंत्रज्ञान यांचा प्रभाव अगदी हळुवारपणे व कमी अधिक प्रमाणात नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या लोक जीवनावर होत आला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या काळात तर शासनाने जाणीवपूर्वक आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना आखून आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले. परिणामी आदिवासींचा आधुनिक तंत्रज्ञानाशी जवळून संबंध येऊ लागला आणि त्यांच्यात खऱ्या अर्थाने सामाजिक बदलाच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. प्रस्तुत शोधनिबंधात नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या लोक जीवनावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा अभ्यास केलेला आहे.

**आदिवासींच्या लोक जीवनावरील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव:**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावाचा नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोक जीवनावर सकारात्मक व नकारात्मक

PRINCIPAL
I.S.S.'s Smt. V.U. Patil Arts &
Late Dr. B.S.Desale Science College
Sakri, Dist. Dhule



Sakri (Dhule)

अशा दोन्ही प्रकारचा परिणाम झाल्याचे दिसते. त्याचे एकत्रितपणे व सविस्तर विवेचन पुढील मुद्यांना अनुसरून करता येईल.

**आदिवासींच्या युवागृहांचा ऱ्हास:**

प्रगत समाजाच्या संपर्काने काही अनिष्ट प्रथा आदिवासी समाजात शिरल्यामुळे यांच्या अध:पतनास सुरुवात झाली आहे. बालविवाह प्रथा, मोठे वधू मूल्य देण्याची रित, स्त्री-पुरुषांच्या संबंधाविषयी संकुचित वृत्ती आदिवासींमध्ये शिरकाव करू लागली आहे. प्रेमाइतकी चांगली व महत्त्वाची दुसरी कोणतीही गोष्ट नाही, असे आदिवासी मानत असल्यामुळे पूर्वी ते विवाहपूर्व व विवाहबाह्य संबंधांकडे उपहासाने पाहत नव्हते. पण त्यामध्ये आता बदल झाला आहे. विशेष म्हणजे आदिवासी संस्कृती जिवंत ठेवण्याचे महत्वाचे कार्य करणारी युवागृहे आज नामशेष होत आहेत. आर्थिक कार्याची ओळख करून देतानाच युवक-युवतींमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याचे काम या संस्थेद्वारे केले जात असे.पण प्रगत समाजाच्या संपर्काच्या प्रभावामुळे आदिवासी लोक आपल्या मुलांना युवागृहात पाठविणे कमीपणाचे मानू लागले आहेत.[1] युवागृहांचा ऱ्हास हे आदिवासी समाजाच्या विघटनाचे प्रमुख कारण असल्याचे मानले जाते. सामाजिक, सांस्कृतिक महत्व असणाऱ्या या संस्थेने आदिवासींच्या प्रथा-परंपरा व जीवनपद्धती यांचे संस्कार नवीन पिढीला प्रदान करण्याचे कार्य करून आदिवासी समाजजीवनाचे सातत्य टिकविण्याचे महत्वाचे काम केलेले आहे. म्हणून या संस्थेच्या पतनाचा मोठापरिणाम आदिवासी समाज जीवनावर झालेला आहे.[2]आधुनिकतेचा हा एक नकारात्मक प्रभाव नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी संस्कृतीवर पडला आहे. निसर्गाच्या सानिध्यात नैसर्गिकपणे बहरणाऱ्या आदिवासी संस्कृतीमधील हा बदल निश्चितपणे चांगला बदल असल्याचे म्हणता येणार नाही.

**दळणवळण सुविधांचा विकास व अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप:**

दळणवळणाची साधने वाढल्याने प्रगत समाजाची वाटचाल जंगलाच्या दिशेने झाली व डोंगर कपाऱ्यात राहणारे आदिवासी प्रगत समाजाच्या संपर्कात येऊ लागले. वारली, ठाकूर, कोकणा, कातकरी, भिल्ल आदी आदिवासी जमातींमध्ये संपर्कातून परिवर्तन होऊ लागले. काहींचे पारंपारिक जीवन बदलले तर काहींमध्ये आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे धारिष्ट निर्माण झाले. या बदलाबरोबरच त्यांच्यामध्ये त्यांच्या आर्थिक व सामाजिक शोषणाची जाणीव देखील निर्माण होत आहे.[3]दळणवळणाच्या सुविधांच्या विकासामुळे नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींची साधी, सरळ असणारी अर्थव्यवस्था बदलत असून तिचे संक्रमण बाजार अर्थव्यवस्थेकडे झुकू लागले आहे. जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र प्रमुख मार्गाशी जोडले जात असल्यामुळे जिल्ह्यातील आदिवासींना जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी येणे जाणे सोयीस्कर झाले आहे. रस्त्याच्या विकासामुळे आदिवासी समाजात सामाजिक परिवर्तनाचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध रस्ते विकास योजनांच्या माध्यमातून आदिवासींचे वस्तीस्थान असलेल्या डोंगर-दऱ्या, कपाऱ्यापर्यंत रस्त्यांचे जाळे पोहोचत आहे. त्यामुळे ग्रामीण वस्ती पाड्यावर राहणाऱ्या आदिवासी लोकांना आपला भाजीपाला व शेतीमाल विक्रीसाठी शहराच्या ठिकाणी येणे जाणे सुलभ झाले आहे. त्यामुळे नफा मिळविणे या हेतूने आदिवासी समाज बाजार अर्थव्यवस्थेत पदार्पण करू लागला आहे.

**आदिवासी बोली भाषांवरील नकारात्मक प्रभाव:**

बाह्य संस्कृतीच्या प्रभावाने आदिवासी लोक आपली मूळ भाषा विसरू लागले असून ही प्रक्रिया अति वेगाने होत आहे. भाषेचा लोप म्हणजे कोणत्याही संस्कृतीच्या अनवतीचे चिन्ह असते. अनेक आदिवासी लोक आपली बोली सोडून प्रगत समाजाच्या भाषेमध्ये अस्खलितपणे बोलू शकतात. याची अनेक उदाहरणे सांगता येतील.[4]आदिवासी साहित्याच्या अभ्यासक डॉ. पुष्पा गावित यांनी आदिवासी बोलीभाषांचे जतन व संवर्धन याबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्या लिहितात की, पावरी बोलीभाषा (नंदुरबार जिल्ह्यातील) लोकवाङ्मयाच्या सर्व प्रकारांनी संपन्न व समृद्ध आहे.पण अलीकडच्या काळात शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने शहरात स्थिर-स्थावर झालेली पावरा आदिवासी कुटुंबे आपला हा



PRINCIPAL Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Tal Sakri, Dist.Dhule
Sakri (Dhule)

पारंपारिक वारसा जतन करण्यासाठी कुठलाही प्रयत्न करताना दिसत नाही. हे असेच चालू राहिले तर कदाचित या बोलीभाषा केवळ उल्लेखापुरत्या राहतील व काळाच्या उदरात लुप्त झालेल्या दिसतील. आपल्या पूर्वजांच्या जीवन अनुभवातून मिळालेले हे अमूल्य शब्द वांग्मय जतन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. इतर भाषांच्या अभ्यासाबरोबरच आदिवासींनी आपल्या मातृभाषेचाही अभ्यास केला तरच ते शक्य होईल. कुठल्याही अंगाने आदिवासी बोलीभाषा म्हणजेच आदिवासींची मातृभाषा ही प्रमाण भाषेपेक्षा न्यून नसल्याचे आदिवासी बोली भाषिकांनीच ठामपणे मांडले पाहिजे. अज्ञानामुळे आजपर्यंत आदिवासी बोली भाषांचा अभ्यास झाला नसल्याचे सत्य स्वीकारून अभ्यासकांनी हातावर हात धरुन न बसता निदान आता तरी या आदिवासी बोली भाषांचा अभ्यास करून त्यांना प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे. त्यांना लिपिबद्ध करून ग्रंथ स्वरूपात त्यांचे जतन केल्यास भावी पिढ्यांना आदिवासी बोली भाषांचे स्वरूप अभ्यासता येईल.[5] शिक्षित, नोकरदार व आर्थिक सुबत्ता आलेल्या आदिवासीं लोकांना त्यांच्या मातृभाषेतून/ बोली भाषेतून बोलणे कमीपणाचे वाटणे हा सामाजिक बदल दुर्दैवी आहे.

**आदिवासींच्या घरांचे बदलते स्वरूप:**

अलीकडच्या काळात सातपुडा पर्वताच्या पहाडी पट्ट्यात राहणारे पावरा या आदिवासी जमातीचे लोक देखील घर बांधणीसाठी सिमेंट तसेच लोखंडी किंवा सिमेंटचे पत्रे यांचा वापर करू लागले आहेत. नोकरदार पावरा जमातीतील व्यक्ती किंवा आर्थिक सुस्थिती असलेले पावरा लोकच अशा प्रकारची पक्की घरे बांधतात. मात्र अशी घरे क्वचितच दिसतात. नोकरीच्या निमित्ताने बाह्य लोकांशी आलेल्या संपर्कामुळे त्यांच्या घरांमध्ये सुधारणा दिसते. सुशिक्षित नोकरदार आदिवासींची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे हे लोक चांगली सुबक घरे बांधून राहू लागले आहेत.[6] तसेच शासनाच्या घरकुल योजनांमुळे देखील आदिवासींच्या घराचे स्वरूप बदलू लागले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन 2020 मध्ये ग्रामीण भागात 399 तर शहरी भागात 410 घरकुले मंजूर झाली आहेत. तसेच शबरी आवास योजनेंतर्गत जिल्ह्यात एकूण 1708 घरकुले मंजूर झाली आहेत.[7] याप्रकारे समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी शासन राबवत असलेल्या या घरकुल योजनांचा लाभ आदिवासींना मिळत असल्यामुळे त्यांना पक्क्या निवाऱ्याची सोय होत असून त्यामुळे आदिवासींच्या जीवनमानाचा स्तर उंचावत आहे.

**आदिवासींच्या वेशभूषेतील बदल:**

आदिवासी समाजाच्या वेशभूषेतील बदल हा बाह्य जगाच्या संपर्काचा एक दृश्य परिणाम आहे. कमीत कमी कपडे वापरत अर्धनग्न स्थितीत राहणाऱ्या आदिवासींचा प्रगत समाजाशी संपर्क आल्यामुळे नखशिखांत कपडे घातलेल्या या लोकांचा त्यांना हेवा वाटू लागला व त्यांनी पूर्ण पोशाख वापरण्यास सुरुवात केली.[8] अलीकडच्या काळात नंदुरबार जिल्ह्यातील सर्व आदिवासी जमाती आधुनिक पोशाख करू लागले आहे. त्यांची घरे, अलंकार, वेशभुषा, आहार या सर्व गोष्टींमध्ये थोड्याफार प्रमाणात परिवर्तन होताना दिसत आहे. शिक्षणामुळे व नोकरी व्यवसायामुळे आदिवासींचे राहणीमानही बदलत आहे.[9] जिल्ह्यातील आदिवासींच्या वेशभूषेमध्ये आता बराच बदल होऊन त्यामध्ये आधुनिकता आलेली दिसते. पुरुष टोपी शर्ट खालून धोतर नेसायला लागले. तर स्त्रिया पोलके घालायला आणि साडी नेसायला लागल्या.[10]

**आदिवासींमध्ये आरोग्यविषयक सुधारणा व जीवनमानातील बदल:**

आदिवासींचा जंगलाशी घनिष्ट संबंध असल्यामुळे आदिवासींइतके वन औषधींचे ज्ञान कोणत्याही समाजात नाही. आधुनिक वैद्यकशास्त्राला आव्हान ठरणारे असाध्य आजारही आदिवासी लोक आपल्या झाडपाल्याच्या औषधाने पूर्ण बरे करतात.[11] पण प्रगत समाजाच्या संपर्काने आदिवासी क्षेत्रात प्रवेश झालेले नवनवे आजार आणि आदिवासींमधील कुपोषणाची समस्या यामुळे आदिवासी भागात आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. मात्र शासनाने आदिवासी क्षेत्रात अनेक आरोग्य सोयीसुविधा निर्माण केल्यामुळे आदिवासींच्या जीवनमानात सुधारणा होतांना दिसत आहे.

आदिवासींमधील कुपोषणाची समस्या नाहीसी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत 'भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना' सन 2016 पासून सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेतंर्गत अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रियांना गरोदरपणाच्या निश्चितीपासून बाळंतपणापर्यंत तर स्तनदा मातांना पहिले सहा महिने एक वेळ चौरस आहार दिला जातो. तसेच अनुसूचित क्षेत्रातील व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 7 महिने ते 6 वर्षे वयोगटातील सर्व बालकांना अंडी, केळी, स्थानिक फळे इ. अतिरिक्त आहार देण्यात येतो.[12]नंदुरबार जिल्ह्यात सन 2020 या वर्षात सार्वजनिक व शासन सहाय्यीत 15 रुग्णालये, 1 विशेष कर्करोग रुग्णालय, 13 दवाखाने, 64 प्रसूतिगृहे, 60 प्राथमिक आरोग्य केंद्रे, 290 आरोग्य उपकेंद्रे असून जिल्ह्यात एकूण 271 डॉक्टर व 631 परिचारिका कार्यरत आहेत. तसेच जिल्ह्यातील या शासकीय दवाखान्यांमध्ये एकूण 1380 खाटांची सुविधा उपलब्ध आहे. यासोबतच जिल्ह्यात खाजगी वैद्यकीय सेवा पुरविणारे एकूण 145 रुग्णालये, 183 दवाखाने, 38 प्रसूतिगृहे असून त्या ठिकाणी 1225 खाटांची सोय आहे.[13]याप्रकारे विविध आरोग्य सोयी व सुविधा जिल्ह्यात उपलब्ध झालेल्या असल्यामुळे आदिवासींचे आरोग्यमानात सुधारणा होत आहे.

**तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामुग्री व उपकरणांचा वापर:**

आदिवासींमध्ये शिक्षण प्रसारासाठी शासनाने सुरू केलेल्या विविध योजनाव कार्यक्रमांमुळे नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. आदिवासी मुले-मुली तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी उच्चशिक्षण घेण्यासाठी जाऊ लागल्यामुळे त्यांचा बाह्य समाजघटकांशी संपर्क होऊ लागला आहे.याबरोबरच त्यांचा परिचय आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामुग्री व उपकरणे यांच्याशी झाला आहे. त्यामुळे शहरी भागात उच्चशिक्षण घेतलेले हे आदिवासी मुले-मुली मोबाईल फोन, स्मार्टफोन, वापरू लागले आहेत. आदिवासी विद्यार्थी शिक्षण संस्थांमध्ये संगणक व इंटरनेट यांचा वापर करु लागल्यामुळे त्यांच्यात आधुनिक मूल्ये रुजू लागली आहेत. यामुळे आदिवासी समाजातील सुशिक्षित मुले-मुलीच खऱ्या अर्थाने सामाजिक बदलाचे वाहक ठरत आहे. नोकरीमध्ये असलेल्या आदिवासी कुटुंबाच्या घरात टी.व्ही., डिटीएच यासारख्या सेवा आल्यामुळे ते आधुनिक जगाशी जोडले जाऊ लागले आहेत. तसेच शेती व अन्य उद्योग व्यवसायातही आदिवासींनी आधुनिक तंत्रज्ञान अंगिकारले असून ते शेतीसाठी ट्रॅक्टर, खते व औषधे यांचा वापर करून अधिकाधिक उत्पादन घेऊन अधिक फायदा मिळविण्याकडे आदिवासी लोकांचा कल वाढू लागला आहे. याप्रकारे आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वीकारामुळे आदिवासी समाजात परिवर्तन होऊ लागले आहे.

**आदिवासींच्या सण-उत्सव प्रसंगीच्या काही चाली रीतींमध्ये बदल:**

सामाजिक बदल ही समाजाच्या अनेक अंगांना स्पर्श करणारी प्रक्रिया असल्याने त्याचा प्रभाव आदिवासींच्या सण-उत्सवांवरही पडत असल्याचे चित्र आज दिसत आहे.नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींमध्ये 'होळी' या सणाला अतिशय महत्व आहे. आदिवासी लोक आजही होळी' चा सण मोठ्या उत्साहाने आनंदात व जल्लोषात साजरा करतात. होळी पेटवल्यानंतर पाचव्या दिवशी विझवण्याचा विधि करूनच होळी मातेला विझवले जाते. आदिवासी याला 'डुडुली' असे म्हणतात. पंधरा-वीस वर्षापूर्वी आदिवासी युवक होळी मातेचे 'राख मिश्रित पाणी' त्याला आवडलेल्या मुलीच्या अंगावर टाकत असे. त्या मुलीने आपल्याशी विवाह करावा असा त्या पाठीमागचा संकेत असायचा. मात्र जर त्या मुलीला हे पसंत नसेल तर ती पंचांना अथवा गावातील प्रतिष्ठितांना हे कथन करायची. मग पंच त्या युवकांकडून दंड वसूल करीत. नारळ, 11 किंवा 21 रुपये व ब्लाऊज पीस देऊन त्या मुलीची छेडखानी केल्याबद्दल क्षमा मागायला लावायचे. मात्र अलीकडे या परंपरा लोप पावल्या आहेत.[14] आदिवासींमध्ये होत असलेल्या बदलाचे हे एक लक्षण असून अन्य बाबतीतही त्यांच्यात परिवर्तन सुरु झालेले आहे. पुढारलेले सुशिक्षित नोकरदार आदिवासी लोक सण-उत्सव प्रसंगी आता गावठी दारू ऐवजी विदेशी मद्यपान करू लागले आहेत. याप्रकारे आधुनिकतेच्या संपर्काने आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावाने आदिवासी लोकजीवन बदलत असल्याचे दिसत आहे.

**समारोप:**

आदिवासी समाजात आधुनिकता आणि तंत्रज्ञानाचा प्रसार सर्व भागात सारख्या प्रकारे झालेला नसल्यामुळे आदिवासींमध्ये होत असलेल्या सामाजिक बदलाच्या स्वरूप सर्वत्र सारखे नाही. ज्या आदिवासी भागात प्रगत समाजाचा वावर वाढला तसेच विकासाची प्रक्रिया ज्याठिकाणी लवकर पोहोचली, तेथील आदिवासींमध्ये सामाजिक बदलाची प्रक्रिया व तिचा प्रभाव दिसून येतो. नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजावरही आधुनिकता व तंत्रज्ञानाचा प्रभाव पडून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवन प्रभावित झाले आहे. आदिवासींवरील हा प्रभाव सर्वच बाबतीत सकारात्मक आहे असे मात्र म्हणता येणार नाही. कारण काही बाबतीत याचा नकारात्मक प्रभाव देखील आदिवासींमध्ये दिसून येतो. असे असले तरी आदिवासी समाज हा मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहू नये व त्यांच्यासाठी प्रगतीची द्वारे खुली व्हावी यासाठी आदिवासींमधील सामाजिक बदलांचे स्वागतच करायला हवे.

**संदर्भ सूची;**


1. गुरुनाथ नाडगोंडे, 'सामाजिक आंदोलने', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1986, पृ.28
2. गुरुनाथ नाडगोंडे, 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2003, पृ.360
3. उपरोक्त, गुरुनाथ नाडगोंडे, 'सामाजिक आंदोलने', 1986, पृ.37
4. कित्ता, पृ.29
5. पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2011, पृ.168
6. डी.जी. पाटील, 'पावरा समाज व संस्कृती', भाषा संशोधन - प्रकाशन केंद्र, बडोदा, 1998, पृ.24
7. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2020, जिल्हा नंदुरबार, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ.135,136
8. उपरोक्त, गुरुनाथ नाडगोंडे, 'भारतीय आदिवासी', 2003, पृ.359
9. उपरोक्त, पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', 2011, पृ.30
10. कित्ता, पृ.137
11. दिपक गायकवाड, 'आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा', सुगावा प्रकाशन, पुणे, 2005, पृ.18
12. विभागाच्या योजनांची माहिती पुस्तिका सन 2019-20, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, पृ.48,49
13. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2020, जिल्हा नंदुरबार, पृ.135,136
14. उपरोक्त, पुष्पा यशवंत गावित, 'पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य', 2011, पृ.53,54